REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २८ डिसेंबर, १९४९ अंक ५०


## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )

स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | २०,६२,२५० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | २९,३८,२०० |
| ठेवी | रु. | ७,४७,०९,९०० |
| खेळतें भांडवल | रु. | १०,६३,००,००० |

प्रांतांतील बारा जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरी-कडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

( United Advertisers )



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.
ता. ३१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.



## अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वर्गणीचे दर :

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ६ आ.

जाहिरातीचे दर :

कराराच्या व इतर अटी जाहिरातवाल्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः—

" अर्थ "
" दुर्गाधिवास " पुणें ४.



तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
च्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**गांधी स्मारक फंडाकडे मागणी**—हिंद सरकारच्या आरोग्य खात्यानें गांधी स्मारक फंडांतून आपणास कांहीं रकम मिळावी अशी मागणी केल्याचें समजतें. हिंदुस्थानांत महारोगासंबंधीं संशोधन-संस्था स्थापन करण्यासाठी ह्या खात्यानें १० लाख रुपयांची मागणी केली आहे. गांधी स्मारक फंडाची रकम सुमारें १० कोटी, ३५ लाख रुपये जमली असून फंडाकडे अनेक कार्यासाठीं मागण्या करण्यांत येत आहेत.

**संस्कृत-इंग्रजी शब्दकोशासाठीं देणगी**—पॅरीस येथील "दि. इन्स्टिटयूट डि सिव्हिलायझेशन इंडिअन" ह्या संस्थेनें संस्कृत-इंग्लिश शब्दकोश तयार करण्यासाठीं वार्षिक १,००० रुपयांची देणगी जाहीर केली आहे. १९४८ सालीं पॅरीसला जी प्राच्य विद्या परिषद् भरली होती, तिनें ह्या शब्दकोशाचें काम पुण्याच्या डेक्कन कॉलेज संशोधन संस्थेकडे सोंपविलें होतें.

**हिंदुस्थानांतील सुपारीचा खप**– हिंदुस्थानांत दरवर्षी ५० लाख मण सुपारी खपते. फाळणी होण्यापूर्वी दरवर्षी ४८ लाख मण सुपारी उत्पन्न होत असे. फाळणीनंतर सुपारी निर्माण करणाऱ्या प्रदेशांपैकीं बराच प्रदेश पूर्व-पाकिस्तानांत समाविष्ट झाला. त्यामुळें सध्या सुपारीचें वार्षिक उत्पादन २५ लाख मणाइतकें खालीं आलें आहे. अर्थातच जवळ जवळ तितकीच सुपारी आतां आयात करावी लागते. ह्या आयातीसाठीं दरवर्षी २५ कोटी रुपये द्यावे लागतात.

**ब्रिटनकडे रेल्वेच्या डब्यांची मागणी**—ऑस्ट्रेलिआकडून ब्रिटिश कारखानदारांकडे रेल्वेच्या डब्यांची मोठ्या प्रमाणावर मागणी करण्यांत आली आहे. सर्व डब्यांची मिळून किंमत सुमारें १३,२०,००० पौंड किंवा १·७५ कोटी रुपये होईल. क्वीन्सलंड सरकारनें ६०० आणि व्हिक्टोरिआ सरकारनें ५०० विनटपाच्या रेल्वेच्या डब्यांची मागणी केली आहे.

**पाकिस्तानजवळ ४० कोटी रुपयांच्या हिंदी नोटा**—पाकिस्तानच्या स्टेट बँकेजवळ व्यवहारांतून काढून घेतलेल्या ४० कोटी रुपयांच्या हिंदी नोटा आहेत असें समजतें. ह्या नोटा हिंदुस्थानच्या रिझर्व्ह बँकेच्या हवालीं करून त्यांच्या बदला करारप्रमाणें पाकिस्तान सरकार मालमत्ता मागेल. ता. १ जुलै १९४८ पासून पाकिस्तानांत रिझर्व्ह बँकेचा अधिकार संपुष्टांत आला तेव्हांपासून गेल्या मार्चपर्यंत १२५ कोटींची मालमत्ता पाकिस्तानला देण्यांत आली. त्यांत ४ कोटी रुपयांचें सोनें आहे.

**अमेरिकेचीं परदेशांत ग्रंथालयें**—अमेरिकन सरकार जगांतल्या ६० देशांत ६७ ग्रंथालयें व २२ वाचनालयें चालवीत आहे. ह्यांचा दरवर्षी ३०,००,००० वाचकांना लाभ मिळतो.

**हिंदी कापडाला डॉलरच्या कक्षेंतील देशांत मागणी**—हिंदी रुपयाचें अवमूल्यन झाल्यानें कापडाच्या निर्यात व्यापारांत हिंदुस्थानला नव्या बाजार पेठा उपलब्ध झाल्या आहेत. दक्षिण हिंदुस्थानांतील एका गिरणीकडे कॅनडाहून कापडाची मागणी करण्यांत आली आहे असें समजतें. ह्या शिवाय 'ग्रे' कापडाची विचारणा आणि मागणी अमेरिकेंतील कांहीं कंपन्यांकडून आली आहे. युरोपमधील इंग्लंड, इटली व स्वीडन-नॉर्वे ह्या देशांकडूनही वरील कापडाची मागणी करण्यांत येत आहे.

**जर्मनींत हिंदी पोलादवाल्यांचे तज्ज्ञ**—पश्चिम जर्मनींतील रूहर ह्या उद्योगधंद्यांविषयीं प्रसिद्ध असलेल्या भागांत हिंदमधील पोलादाच्या धंद्याचे कांहीं तज्ज्ञ सध्या दौरा करीत आहेत. असोसिएशन ऑफ इंडिअन एंजिन बिल्डर्सचे अध्यक्ष श्री. भट्टाचार्य हे ह्या मंडळाचे पुढारी आहेत. आम्हीं जर्मनींत शिकण्यासाठीं हिंडत आहों असे उद्गार श्री. भट्टाचार्य ह्यांनीं काढले.

**पॉवर अल्कोहलची निर्मिती**—ऑगस्ट १९४९ अखेर हिंदुस्थानांत २१,६८,८६४ गॅलन पॉवर अल्कोहल निर्माण करण्यांत आलें. १९४८ सालीं ३५,४२,००० गॅलन आणि १९४७ सालीं २२,००,००० गॅलन पॉवर अल्कोहल निर्माण करण्यांत आलें होतें.

**रशियाकडून अधिक अमोनिआ घेणार**—रशिआ आणि हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान गेल्या सप्टेंबर महिन्यांत झालेल्या कराराप्रमाणें हिंद सरकारनें ३०,००० टन सल्फेट ऑफ अमोनिआ आयात केला. आतां आणखी ५०,००० टन अमोनिआ विकत घेण्याचें सरकारनें ठरवलें आहे असें समजतें.

**काश्मीरमध्यें चिनी भाताची लागवड**— काश्मीरच्या खोऱ्यांत ४२० मण चिनी भाताची लागवड प्रयोगादाखल करण्यांत आली होती. ह्या लागवडीपासून १०,००० मण भाताचें उत्पन्न झालें आहे. पुढील वर्षाच्या भाताच्या हंगामाच्या वेळीं हें १० हजार मण भात शेतकऱ्यांना बियाणें म्हणून वाटण्यांत येणार आहे. काश्मीरमधील निकृष्ट दर्जाच्या भाताऐवजीं चिनी आणि इतर चांगल्या प्रतीच्या भाताची लागवड करविण्याचा काश्मीर सरकारचा विचार आहे.

**मद्रासचा वीजपुरवठा**— मद्रास शहराला सध्या मद्रास इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशन लि. ह्या कंपनीकडून विजेचा पुरवठा होतो. ही कंपनी ताब्यांत घेण्याच्या दृष्टीनें कंपनीच्या यांत्रिक साहित्याची किंमत अजमावण्यासाठीं एका एंजिनिअरिंग फर्मची नेमणूक मद्रास सरकारनें केली होती. कंपनीनें आपला अहवाल आतां सादर केला असून सरकार त्यासंबंधीं विचार करीत आहे. मद्रास सरकारनें कंपनी आपणाकडे घेतली त्यावेळीं कॉर्पोरेशनला १० लाख पौंड दिलेले आहेत.

सारस्वत को-ऑपरेटीव्ह बँक लि.
स्थापना १९१८
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४
सब् ऑफिस : दादर, माहीम
शाखा : मार्केट, बेळगांव
अध्यक्ष : ना. पुं. वर्दे, बी. कॉम्.
सेक्रेटरी : ग. वि. संझगिरी, बी. कॉम्.
एकूण खेळतें भांडवल रु. १ कोटीव


# अर्थ

बुधवार, ता. २८ डिसेंबर, १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


# रोख्यांचे नवे इंडेक्स नंबर

## आंकडे काय दाखवितात ?

हिंदुस्थानांतील रोख्यांच्या किंमतीचे इंडेक्स नंबर सरकार प्रसिद्ध करीत असतें. सुमारें १५० रोख्यांच्या किंमती विचारांत घेऊन हे इंडेक्स नंबर तयार केलेले असत आणि १९२७–२८ मधील किंमती १०० मानून त्यांचेशीं पुढें तुलना केलेली असे. गेल्या कांहीं वर्षांत कित्येक नव्या मोठ्या कंपन्या स्थापन झालेल्या आहेत आणि कांहीं जुन्या कंपन्यांचें काम बंद पडलें आहे. सहाजिकच, त्यांच्या संख्येंत व तौलनिक महत्त्वांत फरक पडला आहे. रोख्यांच्या किंमतींचे इंडेक्स नंबर वस्तुस्थितीचे निदर्शक व्हावेत, ह्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें नवे इंडेक्स नंबर तयार करण्याचें ठरविलें. त्यासाठीं प्रमुख स्टॉक एक्सचेंजवरील प्रातिनिधिक रोख्यांची निवड करण्यांत आली आहे.

एकूण ३९८ रोख्यांच्या किंमतींचा चढ–उतार लक्षांत घेऊन हे नवे इंडेक्स नंबर तयार केले जातात. रोख्यांची विभागणी तीन प्रमुख गटांत करतां येईलः—( १ ) सरकारी आणि निमसरकारी रोखे, ( २ ) ठराविक डिव्हिडंड देणारे औद्योगिक रोखे, आणि ( ३ ) अनिश्चित डिव्हिडंडचे औद्योगिक रोखे. पहिल्या गटाचे पुन: तीन भाग आहेत–( अ ) हिंदुस्थान सरकारचीं कर्जें, ( ब ) हिंदी संस्थानांचीं कर्जें आणि ( क ) म्युनिसिपल, पोर्टट्रस्ट आणि इं. ट्रस्ट कर्जें. दुसऱ्या दोन गटांचे वेगवेगळ्या उद्योगधंद्यांप्रमाणें उप-गट पाडलेले आहेत. प्रत्येक गटांत समाविष्ट केलेल्या रोख्यांची संख्या खालील तक्त्यांत दिली आहे. मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील रोख्यांचे स्वतंत्र आकडे दिले आहेत.

युद्धोत्तर किंमतींच्या कालाची युद्धपूर्व कालाशीं नीट तुलना करतां यावी, ह्यासाठीं इंडेक्स नंबर करतांना १९३८ च्या किंमती १०० मानण्यांत आल्या आहेत. वीज, लोखंड–पोलाद, इत्यादि कंपन्यांना मुंबई स्टॉक एक्सचेंजवर विशेष महत्त्व आहे तर तागाच्या व कोळशाच्या कंपन्यांना कलकत्ता स्टॉक एक्सचेंजवर ज्यास्त महत्त्व आहे. मळयाच्या कंपन्या मद्रास स्टॉक एक्सचेंजवर महत्त्वाच्या असतात. तेव्हां, त्या त्या स्टॉक एक्सचेंजवर ज्यांचे रोखे खरीदले–विकले जातात, तेथील कंपन्यांचें वसूल भांडवल लक्षांत घेऊन त्या प्रमाणांत तेथील किंमतीस जादा महत्त्व दिलें जातें व त्या मानानें इंडेक्स नंबराचा हिशेब केला जातो. सरकारी रोख्यांचें कर्ज किती देणें आहे, ह्यावर त्या रोख्यांचें महत्त्वमापन केलें जातें. मुंबई येथील ८६, कलकत्ता येथील २२६, मद्रास येथील १०८, अशा रीतीनें ३९८ रोखे हिशेबांत घेतले आहेत. त्यावरून, औद्योगिक क्षेत्रांतील तीन्ही स्टॉक एक्सचेंजचें तौलनिक महत्त्व लक्षांत येईल.

१९३८ सालीं सरकारी व निम–सरकारी रोख्यांची किंमत १०० होती, ह्या हिशेबानें ती ऑगस्ट १९४६ मध्यें १०६·०६ वर गेली होती, ती आतां १०१·०२ वर आली आहे. जुलै, १९४६ मध्यें त्याचप्रमाणें प्रेफरन्स भागांची किंमत १४७·०३ इतकी वाढली होती ती आतां १९३८ च्या किंमतीचेहि खालीं गेली आहे. ऑर्डिनरी भागांची किंमत जुलै १९४६ मध्येंच २८९·५५ पर्यंत चढली होती ती आतां ११४·४५ आहे. ह्यावरून रोख्यांचा एकंदर किंमतींचा कल सहज लक्षांत येईल.

### इंडेक्स नंबर तयार करतांना उपयोग केलेल्या रोख्यांची वर्गवारी

| | मुंबई | कलकत्ता | मद्रास | हिंदुस्थान |
|---|---|---|---|---|
| १ | (२) | (३) | (४) | (५) |
| **अ सरकारी आणि निमसरकारी रोखे** | | | | |
| (१) हिंदी सरकारी कर्जें | ८ | ७ | ६ | ८ |
| (२) हिंदी संस्थानी कर्जें. | — | — | ५ | ५ |
| (३) म्युनि. पोर्टट्रस्ट व इं. ट्रस्ट | २ | ५ | — | ७ |
| एकूण | १० | १२ | ११ | २० |
| **ब अनिश्चित डिव्हिडंडचे औद्योगिक रोखे** | | | | |
| (१) बँका | ७ | ७ | १० | १७ |
| (२) विमा कंपन्या | ५ | ४ | ३ | १२ |
| (३) इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट | १ | २ | — | ३ |
| (४) वीज | ६ | ९ | ७ | २२ |
| (५) रेल्वेज् | १ | ५ | — | ६ |
| (६) शिपिंग, इतर वहातुक | २ | ९ | — | ११ |
| (७) मळे | — | २६ | २० | ४६ |
| (८) साखर | १ | ७ | ५ | १३ |
| (९) दारू | — | ३ | — | ३ |
| (१०) कपास | ३२ | ८ | १८ | ५८ |
| (११) ताग | — | २८ | — | २८ |
| (१२) कोळसा | — | २६ | १ | २७ |
| (१३) लोखंड–पोलाद | ४ | ३ | १ | ६ |
| (१४) इंजिनिअरिंग | २ | १३ | १ | १६ |
| (१५) रसायनें | २ | ३ | ४ | ९ |
| (१६) कागद | — | २ | १ | ३ |
| (१७) खाणी व तेल | २ | ६ | — | ८ |
| (१८) सिमेंट | १ | २ | १ | ४ |
| (१९) इतर | ३ | १५ | २ | २० |
| एकूण | ६९ | १७८ | ७४ | ३१२ |
| **क निश्चित डिव्हिडंडचे औद्योगिक रोखे** | | | | |
| (१) मळे | — | ९ | ६ | १५ |
| (२) साखर | — | १ | २० | ३ |
| (३) ताग | — | १४ | — | १४ |
| (४) कपास | २ | ५ | ६ | १३ |
| (५) कोळसा | — | ४ | — | ४ |
| (६) कागद | — | ३ | — | ३ |
| (७) वीज | ३ | — | ४ | ७ |
| (८) लोखंड–पोलाद | २ | — | १ | ३ |
| (९) इतर | — | — | ४ | ४ |
| एकूण | ७ | ३६ | २३ | ६६ |
| एकूण रोखे | ८६ | २२६ | १०८ | ३९८ |

### इंडेक्स नंबर

| | सरकारी व निम सरकारी रोखे | निश्चित डिव्हिडंडचे औ. रोखे | अनिश्चित डिव्हिडंडचे औ. रोखे |
|---|---|---|---|
| १९३८ | १०० | १०० | १०० |
| ४ जाने. १९४६ | १०२·३३ | १३४·९० | २३३·४८ |
| ५ जुलै. १९४६ | १०५·४७ | १४६·४३ | २६९·५८ |
| ३ जाने. १९४७ | १०४·६९ | १३५·६३ | २३७·६० |
| ४ जुलै १९४७ | १०३·५४ | १२०·४८ | १८८·५४ |
| २ जाने. १९४८ | १०३·४० | ११८·४४ | १७९·२० |
| २ जुलै. १९४८ | १०१·९७ | १११·२४ | १३९·२० |
| ७ जाने. १९४९ | १०१·७५ | १०७·१३ | १२८·९५ |
| २ जुलै. १९४९ | १०१·४५ | १०३·१३ | १०८·७४ |
| २९ ऑक्टो. १९४९ | १०१·०२ | ९९·८९ | ११४ ४५ |

### पुणें सें को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री चितळे ह्यांची निवृत्ति

पुणें सेंट्रल को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. द. दि. चितळे बँकेची प्रदीर्घ सेवा केल्यानंतर नुकतेच निवृत्त झाले, परंतु त्यांच्या अनुभवाचा फायदा बँकेस मिळत रहावा म्हणून बोर्डानें सल्लागार व स्पेशल ऑफिसर म्हणून त्यांची योजना केली आहे. श्री. चितळे ह्यांचा बँकेशीं १९२१ सालापासून निकट संबंध आला व सन १९२५ सालीं त्यांची असिस्टंट मॅनेजर म्हणून नेमणूक झाली. १७–१०–१९३२ सालापासून ते मॅनेजिंग डायरेक्टर होते. त्यांच्या कार्याबद्दल बोर्डानें प्रशंसापर ठराव करून त्यांचा गौरव केला आहे. त्यांच्या जागीं असिस्टंट मॅनेजर श्री. मो. वि. रबडे ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. श्री. चितळे ह्यांचा; सहकारी चळवळीस अधिक व्यापक दृष्टीनें आतां फायदा मिळूं शकेल

---

उद्बोधक उद्गार

### अमेरिकेचें भांडवल आणि गरजू देश

" अमेरिकेंतलें खाजगी भांडवल व तांत्रिक मदत बाहेर जावयाची तर त्यासाठी विशिष्ट प्रकारचें 'अनुकूल वातावरण' गरजू देशांनीं निर्माण केलें पाहिजे. अमेरिकेचें भांडवल व तांत्रिक मदत आपल्याला पाहिजे आहे अशी मनापासूनची इच्छा ह्या देशांनी व्यक्त केली पाहिजे. त्यासाठी पुढील प्रकारचीं आश्वासनें देण्याला आपण सिद्ध आहोंत हेंही दाखविलें पाहिजे. हीं आश्वासनें येणें प्रमाणें:— भांडवलाचें रूपांतर करण्याची सवलत, कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न करणें, नुकसानभरपाईशिवाय राष्ट्रीयीकरण होणार नाहीं असें आश्वासन देणें, दुहेरी कर न बसविणें, इत्यादि.

"योग्य वातावरण निर्माण केल्यास जेथें खाजगी भांडवल व तांत्रिक मदत मिळूं शकेल तेथें अमेरिकन सरकार आपला स्वतःचा पैसा देणार नाहीं हें स्पष्ट केलें जावें. जे देश अमेरिकेंतील खाजगी भांडवलाला विरोधी आहेत अशा देशांना अमेरिकन सरकारनें स्वतःच्या क्षेत्रांतही कोणत्याहि प्रकारची सवलत वा मदत देण्याची उत्सुकता दाखवूं नये. युद्धकालापासून जनरल इलेक्ट्रिक कंपनीनें परदेशांत ८ कोटी ५० लक्ष डॉलर इतकें भांडवल गुंतविलें आहे, परंतु मोठ्या प्रमाणावर हे भांडवलाचे व्यवहार करण्याचे मार्गांत पूर्वीपेक्षां आतां मोठे व जास्त धोके आहेत ":— जनरल इलेक्ट्रिक कंपनीच्या बोर्डाचे अध्यक्ष, फिलिप डी. रीड.

## " कपास आणखी आयात करा "

### मुंबई गिरणी मालक संघाची मागणी

मुंबई गिरणी मालक संघानें, कपाशीवरील आयात कर, जकात आणि विक्रीकर रद्द करण्यांत यावा, अशी सरकारकडे मागणी केली आहे. सरकारनें १२ ते १४ लक्ष गाठी आणखी आयात केल्या नाहींत, तर कपाशीची किंमत वाढून कापडहि महाग होईल, असा संघानें इशारा दिला आहे. संघानें आपल्या मागणीचे पुष्ट्यर्थ १९४९–५० मोसमाबाबत खालील आकडे मांडले आहेत:—

| पुरवठा | गाठी |
|---|---|
| गिरण्या व व्यापारी ह्यांचेजवळ | |
| ३१–८–४९ रोजीं शिल्लक ………… | १२,००,००० |
| १९४९–५० मोसमांतील भारतीय | |
| उत्पादनाचा अंदाज ………………… | २६,००,००० |
| अपेक्षित आयात ………………… | ८,००,००० |
| एकूण पुरवठा | ४६,००,००० |
| **मागणी** | |
| भारतांतील गिरण्यामधील अपेक्षित उठाव…… | ४२,५०,००० |
| अपेक्षित निर्गत………………… | २,००,००० |
| गिरण्याबाहेरचा उठाव ………………… | २,५०,००० |
| एकूण मागणी | ४७,००,००० |
| तुटवडा | १,००,००० |

### कारणमीमांसा

" प्रारंभीचा शिलकी साठा ( १२ लक्ष गाठी ) १९४८–४९ च्या प्रारंभीच्या शिलकी साठ्यापेक्षां कमीच आहे. मोसमाच्या प्रारंभीच्या शिलकीपैकीं कांही गाठी गिरण्यांत उपयोगांत आणण्याजोग्या नसणार; म्हणून अखेरचा तुटवडा १ लक्ष गाठींपेक्षांहि अधिक भरेल. तुटवडा वर्षअखेर आला तरी डिसेंबर १९५० पर्यंत नवी कपास हातीं येणार नसल्यामुळें, सरकारनें १२ ते १४ लक्ष गाठी आणखी कपास आधीच आणून ठेवली पाहिजे. मागणी आणि पुरवठा ह्यांचेमधील तफावतीमुळें किंमतींचा कल चढीकडेच रहाणार, हें उघड आहे. म्हणूनच, आणखी कपास लवकर आयात केली पाहिजे. कपाशीची सध्याची किंमतच गेल्या वर्षींपेक्षां ज्यास्त आहे. कपाशीची जागतिक किंमत बंधनांत ठेवणें भारताच्या हातीं नाहीं, परंतु कपाशीवरील आयात कर, एक्साइज पट्टी व विक्रीकर हीं रद्द केल्यानें कपाशीच्या हिंदी गिऱ्हाइकांवरील बोजा बराच कमी होऊं शकेल. सरकारनें हिंदी गिरण्यांच्या उत्पादनाची अपेक्षा ४५०० कोटी वार ठरविली तेव्हां कपाशीच्या पुरवठ्याचें सबंध चित्र त्याचेसमोर बहुधा नसावें. योग्य किंमतीस कपास मिळाली नाहीं तर उत्पादनावर त्याचा परिणाम होणारच. कापडाच्या निर्गतीमुळें आपणांस आज मौल्यवान परदेशी हुंडणावळ मिळूं लागली आहे ती मिळकतहि जाईल आणि कामगारांस पुरेसें काम देणेंहि कठीण जाईल. "

---

### बँकिंग कायद्यांत दुरुस्ती

बँकिंग कंपन्यांचें एकत्रीकरण (ॲमलगमेशन) सत्वर करतां येण्याची तरतूद करणारीं कलमें घालणारी आणि हिंदी बँकांनीं परदेशांत शाखा उघडण्यावर रिझर्व्ह बँकेस नियंत्रणाचा अधिकार देणारी दुरुस्ती बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत करण्यांत येत आहे. त्यासाठी एक बिल अर्थमंत्र्यांनीं पार्लमेंटांत मांडलें आहे.

# टॉल तेल

## जवसाचे तेलाचा नवीन प्रतिस्पर्धी

लेखकः—डॉ. कृ. खं. ढोळे, एम. एस्सी., पीएच्. डी.

गळिताचे धान्याचे उत्पादनामध्यें हिंदुस्थान सर्व जगतांत अग्रेसर आहे हे सर्वांना माहीत आहे. विशेषतः एरंडेल व जवसाचे तेलाबाबतींत हिंदुस्थानला मोनॉपोली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रंग रोगणाचे धंद्यांत जवसाचे तेलास महत्त्वाचें स्थान असल्यानें हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी लाखों टन जवस निर्यात होत असे. अलिकडे अर्जेंटिना, ब्राझील वगैरे देशांतून जवसाचें उत्पादन होऊं लागल्यानें हिंदुस्थानची मोनॉपोली नाहींशी होऊं लागली आहे. गेलीं एक दोन वर्षे आपल्या देशांतून जवसाची निर्यात बरीच घटत आहे असें दिसतें. या घटीचीं कारणें मुख्यत्वें करून (१) आपल्या जवसाच्या उत्पादन किंमती वाढत आहेत, (२) आपले व्यापारी जवसांत भेसळ इत्यादि अनेक लबाड्या करून त्याची जागतिक पत कमी करीत आहेत, इ. इ. दिलीं जातात. विशेषतः उत्पादनाच्या किंमतींत वाढ झाल्यानें निर्यातींत फारच घट झाल्याची तक्रार आहे. या दोन कारणाशिवाय आणखी एक कारण म्हणजे जवसाचे तेलास शास्त्रीय संशोधनामुळें नवीन प्रतिस्पर्धी निर्माण होत आहेत हें होय. खालील कोष्टकांत अमेरिकेंत वापरल्या जाणाऱ्या जवसाचे तेलाचे आणि त्याच्या प्रतिस्पर्धी तेलांचे आंकडे दिले आहेत. जवसाचे तेलाचा मुख्य उपयोग रंगरोगणें तयार करण्याकडे होतो. त्याशिवाय मेणकापड, लिनोलियम, मुद्रण—शाया वगैरे धंद्यांतही होतो.

| तेलाचें नांव | कोटि पौंड |
|---|---|
| जवस | ४५·० |
| सोयाबीन | ११·० |
| टुंग | ७·५ |
| माशांचे तेल | ४·० |
| टॉल तेल | ३·५ |
| निर्जलित एरंडेल | २·७५ |

जवसाचे तेलाशिवाय बाकीचीं तेलें या क्षेत्रांत नवीन पदार्पण करीत आहेत. त्यांतील टुंग व सोयाबीन तेलें हीं वनस्पतिजन्य आहेत, तर माशांचे तेल, टॉल तेल आणि निर्जलित एरंडेल हीं थोड्या फार प्रमाणांत सुधारित (मॉडिफाइड) तेलें आहेत. ह्या कोष्टकावरून जरी जवसाचे प्रतिस्पर्धी फार मोठ्या प्रमाणावर वापरले जात नसले तरी एकूण वापरल्या जाणाऱ्या तेलाच्या सुमारें ४०% आहेत.

टुंग तेल हें चीन—जपानमध्यें उगवणाऱ्या एका जातीच्या झाडाच्या फळांतील बियापासून तयार करतात आणि तें कित्येक वेळां जवसाचे तेला इतकेंच महत्त्वाचें समजलें जातें. विशेषतः विमानांचे रंग यापासून तयार करतात.

सोयाबीन तेल व माशांचें तेल हें जवसाचे बद्दली वापरतात. कारण हीं तेलें स्वस्त असून वापरण्याचे खर्चांत बचत होते. जरी जवसाचे तेलाइतकीं वापरण्यास उत्तम नसलीं तरी तीं किंमतीच्या दृष्टीनें फायदेशीर होत असल्यानें बऱ्याच उद्योगधंद्यांतून तीं वापरलीं जातात.

निर्जलित एरंडेल (डीहैड्रेटेड कॅस्टर ऑइल) हें टुंग तेलाच्या ऐवजीं बऱ्याच ठिकाणीं वापरलें जातें. साध्या एरंडेलापासून रासायनिक क्रियेनें एरंडेलांतील हैड्रोजन व ऑक्सिजनचे कांहीं अणू कमी करून हें तयार केलें जातें. वरील मूलतत्त्वें जेव्हां एरंडेलातून बाहेर निघतात तेव्हां ती पाण्याच्या रूपांत निघतात. म्हणून या तेलास निर्जलित एरंडेल म्हणतात; म्हणजे मूळ एरंडेलांत पाणी असतें असा कोणी गैरसमज करून घेऊं नये. निर्जलित एरंडेल टुंग तेलाऐवजीं उत्तम रीतीनें वापरतां येतें. या दृष्टीनें हिंदुस्थानला त्याचें फार महत्त्व आहे. सर्व जगांतील ८०% एरंडेल आपल्या देशांत तयार होते व त्यांतील ६५% एरंडेल हैद्राबाद संस्थानांत होतें.

टॉल तेल हा जवसाचे तेलाचा अगदीं नवीन प्रतिस्पर्धी आहे. जवसाचे तेलाचा मुख्य गुणधर्म म्हणजे हवेंतील ऑक्सिजन बरोबर संयोग पावून एक घट्ट, तुकतुकीत, पापुद्रा तयार होणें हा होय. जेव्हां जवसाचे तेल लाकूड अगर इतर जिनसांना लावलें जातें तेव्हां त्याच्या वरील गुणधर्मामुळें एक चकचकीत पापुद्रा तयार होऊन शोभा येते. जवसाच्या तेलाप्रमाणें हवेंतील ऑक्सिजन बरोबर संयोग पावून वाळणाऱ्या (घट्ट होणाऱ्या) तेलांना "सुकणारीं तेलें (ड्राइंग ऑइल्स) म्हणतात. अशा तेलापासून निरनिराळ्या प्रक्रिया करून रंगरोगणें (वार्निश) तयार करतात.

टॉल तेल हें थोडे-फार कृत्रिम (सिंथेटिक) तेल म्हणतां येईल. कागद-कारखान्यांतून लांकडापासून सल्फाईट पद्धतीनें रांधा करतांना त्यांतील निरुपयोगी मळींतून याचा जन्म आहे. वस्तुतः हें लांकडापासूनच निर्माण होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. सल्फाईट पद्धतींत लाकडांतील तैलयुक्त भाग, राळ, राळीय आम्लें, (रोझिन ॲसिड्स) तैल-आम्लें (फॅटि ॲसिडस्) इ. पदार्थ सोडियम लवणाचे रूपांत गटारांतून वहात जातात व हें पाणी हौदांत सांठविल्यावर मळीच्या स्वरूपांत वर तरंगून येतात. ही मळी जमा करून वाळवून त्यावर गंधिकाम्लाची (सल्फ्यूरिक ॲसिडची) प्रक्रिया करून टॉल तेल तयार करतात.

टॉल तेल शास्त्रीय दृष्ट्या अनेक पदार्थांचें मिश्रण आहे. त्यांत लांकडांतील राळ, राळीय—आम्लें, ओलीक आम्ल इ. पदार्थ असल्यानें त्यांस "सुकण्याचा" गुणधर्म प्राप्त होतो. सध्यां टॉल तेल जवसाचे तेलाऐवजीं वापरूं लागले आहेत त्याचें मुख्य कारण म्हणजे त्याची अत्यंत स्वस्त किंमत होय. टॉल तेल निरुपयोगी मळीपासून निघत असल्यानें त्याच्या कच्च्या द्रव्यांची किंमत जवळ जवळ शून्य म्हणण्यास हरकत नाहीं. कागदाचे धंद्यास हा जोड-धंदा म्हणून फायदेशीर धंदा झाला आहे. सध्यांच्या लोकशाही युगांत कागदाचा धंदा आवश्यक धंद्यांपैकीं एक असल्यानें टॉल तेलाची निर्मिति निश्चित आहे; म्हणजे गळिताचे धान्याप्रमाणें हवामान, पाऊस यांवर अवलंबून नाहीं. कागदाचे धंद्यांत उत्तम प्रतीचे शास्त्रज्ञ भाग घेत असल्यानें टॉल तेलाची निर्मिती योग्य तऱ्हेनें होऊं शकेल. जरी सुरवातीस टॉल तेल जर्मन आणि स्वीडिश कारखान्यांतून होत असे तरी सध्यां बहुतेक पाश्चात्य राष्ट्रांतून निर्माण होत आहे. सुरवातीस दिलेल्या कोष्टकांत निर्जलित एरंडेलापेक्षां टॉल तेलाचाच खप सध्यां अमेरिकेंत जास्त आहे. वास्तविक निर्जलित एरंडेलाचें उत्पादन टॉल तेलाच्या बरींच वर्षे अगोदरपासून होत असून सुद्धां टॉल तेलानें त्याचेपुढें आघाडी मारली आहे.

वरील सर्व चर्चा आपलेकडील जवसाचे तेलाच्या आणि एरंडेलाच्या धंद्यास उद्बोधक होणार आहे. पाश्चात्य राष्ट्रांतून शास्त्रीय संशोधन करून तिकडे न निर्माण होणाऱ्या पदार्थांऐवजीं कृत्रिम पदार्थ तयार करीत आहेत तर आमचेकडील पदार्थांच्या बाजारपेठा केवळ निष्क्रियतेमुळें आपण घालवीत आहोंत.

वस्तुतः जवसाचें तेल त्याच्या अनेक महत्त्वाच्या गुणधर्मामुळें प्रतिस्पर्ध्यांना तोंड देऊन टिकून राहिलें आहे. संशो-

घन करून त्याच्या उपयोगांत भर घालून त्याचें महत्त्व वाढविणें हृ आपल्या राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य आहे. असें जर न घडलें तर निळीच्या धंद्याप्रमाणें जवसाचाही धंदा आपल्या देशांतून नाहींसा होईल.

जवसाचें तेल, एरंडेल, अभ्रक, लाख इ. बाबतींत अजून हिंदुस्थानला मॉनॉपोली आहे आणि ही जर आपण हळू हळू गमावून बसलों तर परदेशी चलनाचे बाबतींत आपण आणखी अगतिक होऊन बसूं. आपलेकडील लाकडापासून कागदाचा रांधा तयार करणाऱ्या गिरण्यांना संशोधन करून टॉल तेलासारखे पदार्थ मळींतून निर्माण करतां येणार नाहींत असें नाहीं. पण तिकडे लक्ष दिलें जात नाहीं.

टॉल तेलाचा एक विशेष महत्त्वाचा उपयोग गेल्या महायुद्धांत झाला. अमेरिकन सैन्याची अवजड बॉंबर विमानें उतरविण्याकरितां ठिकठिकाणीं विमानतळ बांधणें अवश्य होतें. कित्येक वेळां हे विमानतळ दलदलीच्या जागींही बांधावे लागत. अशा वेळीं ओल्या मातीमधील पाण्याचा निचरा करून माती डांबरला घट्ट चिकटून देण्याचें काम टॉल तेलानें केलें. तेव्हां दलदलीचे प्रदेशांत मोठमोठीं विमानें उतरविण्याइतके टणक विमानतळ झटपट बांधण्याचें मुख्य श्रेय टॉल तेलाला आहे.

### दाढी करूं नका

न्यूयॉर्कमध्यें पाण्याचा तुटवडा पडला आहे. लोकांनीं स्नानासाठी पाणी खर्च करूं नये आणि दाढी करण्याचेंहि टाळावें असा तेथील नागरिकांना अधिकाऱ्यांनीं सल्ला दिला आहे. वाढलेली दाढी नागरी कर्तव्यपालनाचें प्रतीक बनलें आहे.

### सुशिक्षित मध्यमवर्गीयांवरील ताणाचा परिणाम

रांची येथील इंटर-प्रॉव्हिन्शिअल मेंटल हॉस्पिटलचे मेडिकल सुपरिंटेंडेंट, मेजर आर. बी. डेव्हिस, ह्यांच्या ताज्या अहवालाप्रमाणें, गेल्या कांहीं वर्षांत सुशिक्षित मध्यमवर्गीयांत मानसिक व्यथा वाढत्या प्रमाणावर आहे. रहाणीच्या, सामाजिक जुन्या कल्पनांशी नव्या कल्पनांचा होणारा संघर्ष हें ह्या व्यथेचें एक प्रमुख कारण आहे. वरचेवर अनुभवावी लागणारी उपासमार, हें कारण वेडेपणाच्या व्यथेच्या मुळाशीं मुख्यतः आढळतें, असा बंगलोर येथील मेंटल हॉस्पिटलचे सुपरिंटेंडेंट डॉ. गुंडस्वामी ह्यांचा अनुभव आहे.

### रा. ब. शेंबेकर यांचा सत्कार

आदर्श कृषिसंस्था लि. ला सल्ला देण्यासाठी रा. ब. ग. गो. शेंबेकर हे ह्या महिन्याचे प्रारंभीं गेले होते. त्यावेळीं त्यांना संस्थेनें मानपत्र अर्पण करतांना, संस्थेच्या बहुविध कार्यकारी योजनांचा आढावा घेण्यांत आला. नाशिक येथील "श्री. कृषिसाधन", दौंडाइचे येथील विद्युत् पुरवठा केंद्र व लिफ्ट इरिगेशनकरतां स्थापन झालेली कंपनी, दहिवड येथील शेतीबाबतचा प्रयत्न, हा संस्थेचा आजचा व्याप आहे. इतरहि योजना आखलेल्या आहेत.

### "असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

वरील कंपनीनें ३१ जुलै, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी ९,६५,०९,९९८ रुपयांची विक्री केली. म्हणजे, पूर्वीच्या वर्षीच्या मानानें विक्री २७% वाढली. निव्वळ नफा ५९% वाढून त्याचा आकडा १,२०,४९,५३१ रु. झाला. १९४६-४७ चें डिव्हिडंड (करमाफ) ५% होतें; १९४७-४८ चें ६% होतें व आतां ७% सुचविण्यांत आलें आहे.

## म्हैसूर संस्थानांतील रेशमाचा धंदा

म्हैसूर सिल्क मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची दुसरी वार्षिक सभा, संस्थानचे उद्योग व व्यापारमंत्री श्री. दासप्पा ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतीच भरली होती. ह्या सभेंत असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं रेशमाच्या कारखान्यांची परिस्थिती सध्यां कशी बिकट झाली आहे आणि ती सुधारण्यासाठी काय उपाय योजले पाहिजेत ह्यासंबंधीं आपले विचार प्रगट केले. श्री. नाईक म्हणाले:— "म्हैसूरमधील बऱ्याच कारखान्यांना आपलीं दारें बंद करावीं लागलीं आहेत. जे कांहीं कारखाने चालू आहेत त्यांना व्यवहारांत तोटा सोसावा लागत आहे. कारखाने बंद पडल्यामुळें कामगार वर्ग इतस्ततः विखुरला जाऊं नये म्हणून शक्य ती खबरदारी घेण्यांत आली आहे. परंतु हा धंदा चालावयाचा असेल तर जपान आणि इतर ठिकाणहून रेशमाचें सूत आयात करून तें इंडियन टॅरीफ बोर्डानें ठरविलेल्या दराप्रमाणें उपलब्ध करणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, जपानप्रमाणें हिंदुस्थानांतही रेशमाविषयीं संशोधन करणारी एक मध्यवर्ती संस्था स्थापन करणें आवश्यक आहे. म्हैसूर संस्थानचे रेशमाच्या खात्याचे मंत्री श्री. सुब्रमण चेट्टी ह्यांनीं आपल्या भाषणांत रेशमाच्या धंद्यांतील अडचणींची आणि त्या दूर करण्यासाठी करण्यांत येत असलेल्या सरकारी प्रयत्नांची माहिती सांगितली. ते म्हणाले:— "रेशमाच्या सुताच्या अभावामुळें बऱ्याच कारखान्यांची कुंचबणा होत आहे याची सरकारला जाणीव आहे. सुताचा पुरवठा करण्यासाठी इटलीहून सूत आयात करण्याची परवानगी मिळविण्यांत आली असून मागण्याही नोंदण्यांत आल्या आहेत. परंतु पौंडाचें अवमूल्यन झाल्यामुळें इटलींतील रेशमाच्या किंमती ४० टक्क्यांनीं वाढल्या आहेत. जपानमधून रेशमाचें सूत आणावें तर डॉलर्सची टंचाई आड येत आहे. ऑल इंडिया सिल्क बोर्डानें हिंद सरकारला, परदेशी रेशमाच्या सुताच्या आयातीवरील जकात कमी करण्याची विनंति केली आहे. हिंद सरकार ह्या संबंधीं लवकरच कांहीं तरी निर्णय घेणार आहे असें समजतें. सध्या रेशमाच्या धाग्यापेक्षां रेशमाच्या कापडावर कमी आयात जकात घेतली जाते. हें धोरण धंद्याचा घात करणारें आहे. रेशमाचा धंदा चालू ठेवण्यासाठी म्हैसूरचें सरकार आपणाकडून शक्य ती खटपट करीत आहे. तथापि, म्हैसूरचें रेशीम कितीही चांगलें असलें तरी तें आंतरराष्ट्रीय दर्जाला पोंचलेलें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे आणि त्याचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न कसोशीनें करण्यांत आले पाहिजेत. जपानमधील रेशमाच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी पांच जणांचें एक मंडळ त्या देशांत पाठविण्याचें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे. रेशमाविषयीं संशोधन करणाऱ्या संस्थेच्या उपक्रमालाही हात घालण्यांत आला आहे."

सभेचे अध्यक्ष श्री. दासप्पा (उद्योग मंत्री) ह्यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, ह्या धंद्यांत काम करणाऱ्या सर्वांनीं नफ्याची वाटणी योग्य होईल अशी काळजी घेतली पाहिजे. सध्या तुतीच्या झाडाचे मालक आणि रेशमाचे कोष वाढविणारे ह्या दोघांना नफ्याचा फार मोठा वांटा मिळतो.

**नोबेल पारितोषकें आणि अवमूल्यन**—पौंडाच्या गटांतील सर्वच राष्ट्रांनीं आपल्या चलनाचे भाव कमी केल्यामुळें नोबेल पारितोषकांच्या किंमतींतही घट झाली आहे. गेल्या वर्षी एका पारितोषकाचे ४०,००० डॉलर्स मिळत असत. ह्या वर्षी त्याच पारितोषकाची किंमत ३०,००० डॉलर्स होईल.

## कारखानदार आणि समाज

श्री. संपादक 'अर्थ' यांसी सा. न. वि. वि.

"अर्थ"च्या दि. ३० नोव्हेंबरच्या अंकांतील भोर येथील महाराष्ट्र कारखानदार परिषदेबाबतचा श्री. देवळ यांचा अहवालवजा लेख वाचला. भोर परिषदेंत प्रत्यक्ष चर्चा काय झाली, सामाजिक अशांततेवर उपाय म्हणून कोणती विकास योजना मांडण्यांत आली याची मला माहिती नाहीं. तथापि श्री. देवळ यांचा लेख वाचून जे विचार मनांत आले ते येथें मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

कारखानदारांनीं नफ्याचा कांहीं भाग सामाजिक कार्याकरितां खर्च करावा, अशी सूचना. त्यावर श्री. देवळ व कांहीं कारखानदारांचें म्हणणें असें दिसतें कीं नफ्यांतील तो भाग धंद्यांतच वापरून उत्पादन-कार्यक्षमता वाढविण्याकडे तो खर्च करावा; नवीन यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानें उत्पादन खर्च कमी करावा. तसें झाल्यावर माल स्वस्त विकणें शक्य होईल आणि तेवढा समाजाचा फायदा होईल. उत्तम आणि स्वस्त उत्पादन करण्याचें कारखानदारांनीं ठरविल्यानंतर त्यांच्यापासून आणखी कांहींही अपेक्षा समाजानें करूं नयेत असें मतही श्री. देवळ यांनीं दिलें आहे.

तत्त्वतः श्री. देवळ म्हणतात त्याबाबत दुमत असण्याचें कारण नाहीं. परंतु व्यावहारिक दृष्ट्या, विशेषतः स्थानिक परिस्थिति लक्षांत घेतां महाराष्ट्र कारखानदारांनीं असें आग्रहानें म्हणावें हें मला तरी तें पटत नाहीं. समाजाला त्यांनीं त्यामुळें विनाकारण दुखविलें आहे. कारखान्याचा नफा पुन्हां कारखान्यांत जावा व धंदा वाढावा हें खरें. प्रत्यक्ष आज व्यवहारांत तसं कितीसें होतें?

नफ्यांतील भाग कारखानदारांनीं कराराप्रमाणें घ्यावयाचा, सरकारी कर द्यावयाचा; शेअरहोल्डर्सना डिव्हिडंड द्यावयाचें; कामगारही आपला वाटा हक्कानें मांडत आहेत, घेत आहेत. मग काटकसर समाजाला देण्याबाबतच कां? कितीसें भांडवल सांठणार आहे तेवढ्यानें?

अनुभव असा आहे कीं, कांहीं महत्त्वाच्या सुधारणा करण्याची किंवा यंत्रसामुग्री घ्यावयाची वेळ आली म्हणजे नवीन भांडवल आणवूनच या गोष्टी कराव्या लागतात. मालाच्या विक्रीची किंमत उत्पादन-खर्चानुसार कमीअधिक असते हा सिद्धान्त तत्त्वतः खरा असला तरी व्यवहारांत तसें नसतें! मालाच्या विक्रीची किंमत बाजारभावावर अवलंबून असते! नवीन यंत्रें बसवून उत्पादन-खर्च कमी झाला तर होणारा फायदा कारखाना मिळवीत असतो. किंमत कमी केली जाते (नफ्याला काट मारला जातो) तेव्हांच कीं जेव्हां बाजारांत दुसऱ्याचा माल स्वस्त येतो. अनिर्बंध स्पर्धा हाच खरा "सेफ्टी व्हॉल्व्ह" आहे. आज महागाईचा एवढा मोठा समंध तयार झाला असतानाही सरकार ५-१० टक्क्यांहून अधिक किंमती उतरविण्याची भाषाही बोलूं शकत नाहीं! यावरून किंमतीचें अर्थशास्त्र सहज लक्षांत येईल.

अधिकांत अधिक उत्पादन करावयाचें तर त्याला भांडवल पाहिजे. कमींत कमी किंमतींत माल विकावयाचा तर तो तयार करणारीं अद्यावत् यंत्रें पाहिजेत. म्हणजे पर्यायानें भांडवल पाहिजे.

उत्तम दर्जाचा माल काढावयाचा तर यंत्रांबरोबरच त्यावर समाधानानें, आत्मीयतेनें काम करणारे कामगार पाहिजेत. कामगार काम चांगलें अगर वाईट, जलद अथवा हळू करतो तें त्याला मिळणाऱ्या केवळ वेतनावर अवलंबून नसून त्याच्या कारखान्याबाबत, चालकमंडळींबाबत त्याला काय वाटतें, समाजांत त्यांचेबद्दल काय बोललें जातें यावरही बरेचसें अवलंबून असतें.

या बाबतींत सरकारबरोबरच खुद्द कारखानदारांवरही जबाबदारी येऊन पडते. कारखानदारांबद्दल त्यांच्या भावना काय आहेत, समाजाकरितां ते प्रत्यक्ष काय करतात या गोष्टींचें महत्त्व जितकें लवकर मान्य केलें जाईल तेवढें अधिक बरें.

अमेरिकेंतील रॉकफेलर आणि हिंदुस्थानांतील टाटा यांनीं सामाजिक गोष्टींकरितां दिलेल्या देणग्या व त्याकरितां चालविलेल्या संस्था आपल्याला मार्गदर्शक नाहीं का होणार?

—विवेक परदेशी

## भारतांतील विमा व्यवसायाचा वार्षिक आढावा

"रुपयाच्या अवमूल्यनाचे अंतिम परिणाम काय होतील यासंबंधीं कोणताही निश्चित अंदाज करणें अद्यापीही अकालींच ठरेल, परंतु १९३१ त अवमूल्यनानंतर घडलेली परिस्थिति विचारांत घेतां जास्तींत जास्त उत्पादन, कमी खर्च व चढाओढीनें वाढती निर्यात अमलांत आली तर रुपयाच्या अवमूल्यनामुळें अखेरीस भरभराटीचा काळ येईल असें ठोकळ मानानें म्हणतां येईल" असे विचार सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स यांच्या इंडियन इन्शुरन्स इयर बुक १९४९ मधील त्यांच्या प्रतिवृत्तांत व्यक्त केलेले आहेत. व्यापार व उद्योगधंदे भरभराटले तर देशांतील विमा व्यवसायही वाढणें क्रमप्राप्तच आहे, असें ते पुढें म्हणतात.

७ ऑक्टोबर १९४९ या दिवशीं भारतांत १९३८ च्या विमा कायद्याखालीं नोंदविलेल्या अशा ३३९ विमा संस्था होत्या, यांपैकीं २३४ भारतीय व १०५ परकीय होत्या. भारतीय विमासंस्थांपैकीं १४१ केवळ आयुर्विम्याचें, ४८ आयुर्विमा व इतर प्रकारचें आणि ४५ संस्था आयुर्विम्याखेरीज विम्याचेंच काम करीत होत्या. परकीय विमासंस्थांचे बाबतींत हेच आंकडे अनुक्रमें ५, १९, व ८१ होते.

### उत्पन्नांत घट

१९४५-४६ हीं वर्षे विमा व्यवसायांत अतिशय तेजीचीं गेलीं आणि त्यानंतर प्रमाण कमी कमीच होत आलें. फाळणीनंतरची अस्थिर परिस्थिति, लोकांच्या खऱ्या उत्पन्नांतील घट आणि आतां पाकिस्तान वसाहतींत मोडणाऱ्या भागांत बंद पडलेलें काम यामुळेंच एकंदर व्यवसायांतही घट झाली असावी असें वाटतें.

विम्याच्या कार्यांत १९४८ मध्यें १९४७ च्या मानानें ५ टक्के व १९४६ मध्यें झालेल्या कामाच्या मानानें १७ टक्के घट झाली. पडणाऱ्या व्याजाचें सर्वसाधारण प्रमाणही घसरलें असून विमापत्रें रद्द होण्याचें मान वाढतें आहे. गेल्या युद्धामुळें लोकांच्या उत्पन्नांत झालेला बदल आणि तदनंतरचे प्रकार यामुळें देशांतील संपत्तीचें विभाजन पार बदलून गेलें आहे. संस्थांनांचें विलिनीकरण आतां जवळ जवळ पुरें होत आलें असल्यामुळें आणि निरनिराळ्या प्रांतांनीं हातीं घेतलेल्या जमीन सुधारणेच्या दूरगामी योजनामुळें भावी कालांतही उत्पन्नांतील या बदलाला चालनाच मिळण्याचा संभव दिसतो. आतांपर्यंतचा आयुर्विमा व्यवसायाचा मुख्य आधार जो मध्यमवर्ग तो हळूहळू नष्ट पावण्याचा संभव आहे. म्हणून विमा-संस्थांनीं त्यांना त्या आहेत त्या ठिकाणीं टिकून राहावयाचें असेल तर व्यवसायासाठीं निरनिराळे मार्ग हुडकून काढणें भाग आहे.

आग व इतर प्रकारच्या विम्यांविषयीं पाहतां, हप्त्यांच्या उत्पन्नाचे बाबतींत या सर्व प्रकारांत सामान्यपणें वाढ झाल्याचें दिसतें. विशेषतः ही भर सागरी विम्यांचे बाबतींत दिसून येते. सागरी व इतर कामांत यावर्षी खूप नुकसान झालें. एकंदरींत काम समानधारकारक आहे, परंतु उत्साहवर्धक नाहीं.

सर्वसाधारण विमाधंद्याची प्रगति देशाच्या आर्थिक स्थितीच्या प्रगतीशीं निगडित असते, हें तर उघड आहे. सरकारनें केलेल्या उपाययोजनांमुळें देशांत व्यापार व उद्योगधंदे भरभराटले तर या वर्गीतील विम्याचें काम खात्रीनें वाढतें.

### सहकारी बँकांनाच प्राधान्य द्या

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटनें ठाकुरदास कमिटीच्या (रूरल बँकिंग इन्कायरी कमिटीच्या) प्रश्नावलीस उत्तर पाठविलें आहे. सहकारी बँकांचाच खेडेगांवीं जनतेशीं जिव्हाळ्याचा संबंध येतो, व्यापारी बँका शेतीविषयक कर्जें देऊं शकत नाहींत, फक्त ठेवी पत्करून त्या शहरांकडे नेतात, सहकारी बँकांनीं अगोदरच बँकिंगच्या सोईचें जाळें खेडेगांवीं प्रदेशांत पसरविलेलें आहे, रिझर्व्ह बँकेनें सहकारी बँकांविरुद्ध निष्कारण वाद उपस्थित केला आहे, कांहीं झालें तरी खेडेगांवीं आर्थिक जीवनांत व्यापारी बँकांना स्थान असूं नये, इत्यादि मुद्दे इन्स्टिटयूटनें आपल्या उत्तरांत मांडले आहेत.

### हिंदी एक्सचेंज बँकेच्या आफ्रिकन ठेवीदारांना सरकारी मदत

एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका ही बंद पडली. तिच्या नैरोबी येथील शाखेंत तेथील आफ्रिकन लोकांच्याहि कांहीं ठेवी होत्या. सहाजिकच, तेथें हिंदी व आफ्रिकन लोकांचे संबंध बरेच बिघडले. आफ्रिकन ठेवीदारांपैकीं जे अगदीं गरीब असतील त्यांना 'मदत' म्हणून कांहीं रक्कम देणें राजकीय दृष्ट्या आवश्यक झालें आहे असें भारत सरकारास वाटलें व त्यासाठीं त्यानें पूर्व आफ्रिकेचे हाय कमिशनर ह्यांच्या स्वाधीन एक लक्ष रुपये केले आहेत.

### प्रो. दावर ह्यांचा मृत्यु

'दावर कॉलेज ऑफ कॉमर्स, मुंबई'चे प्रिन्सिपॉल, प्रो. सोराब आर. दावर हे वयाच्या ७० व्या वर्षी नुकतेच मृत्यु पावले. ४९ वर्षांपूर्वीपासून ह्या वकिलानें व्यापारी शिक्षणास वाहून घेतलें होतें.

### निर्गतीचा उच्चांक

भारतानें नोव्हेंबर महिन्यांत ५१ कोटी, ६ लक्ष रुपयांची निर्गत करून ४२ कोटी, ४६ लक्ष रुपयांची आयात केली. अशा रीतीनें, परराष्ट्रीय व्यापारांत ८ कोटी, ६ लक्ष रुपयांचा अनुकूल वाढावा उरला. दरसाल नोव्हेंबर-डिसेंबरांत भारताची निर्गत नेहेमीच ज्यास्त होत असते, ह्या दृष्टीनें ह्या आकड्यांस फाजील महत्त्व देणें योग्य होणार नाहीं; तथापि वाढाव्याची प्रवृत्ति समाधानकारक वाटण्याजोगी आहे.

### डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्सचें संमेलन

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स पुणें, ह्या संस्थेचें ३० वें वार्षिक संमेलन इन्स्टिटयूटच्या स्वतःच्या इमारतींत श्री. आ. रा. भट, एम. कॉम., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार, ता. २५ डिसेंबर रोजीं मोठ्या उत्साहानें पार पडलें.

**बिनतिकिटाचे प्रवासी**—१९४९ च्या जानेवारी ते जून ह्या सहामाहींत हिंदुस्थानांतील रेल्वेंतून ३,२४,००,००० लोकांनीं बिन-तिकिट प्रवास केला. त्यांच्यापासून ९२,५२,००० रुपये दंडादाखल वसूल करण्यांत आले.


बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.
हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा
शाखाः—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.
मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे
★ ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.
बचतीच्या आकर्षक योजना
★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ तें ५ वर्षें पर्यंत स्वीकारल्या जातात.
★ सेव्हिंग बँकेत रु. १५,०००/- पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.
वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)
श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५
एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.